नरुण भारत

# कार्यालय नगरपंचायत कुरखेडा

## ता. कुरखेडा जि. गडचिरोली

Email ID. No. nagarpanchayatkurkheda@gmail.com
फोन नं. ०७१३९,२४५१८३

नपंकु/जा.क्र./९७४/२०२५ दिनांक-२९/०१/२०२५

## जाहीर प्रसिध्दीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व संमायोजित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ दि. २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये **नगरपंचायत** या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरिक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्त्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ २०१५/प्र. क्र. १८९/नवि १४ दिनांक २३/०६/२०१५ नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकूण ७१ सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम ३(अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. परंतु त्यापैकी ०४ सेवा या फक्त महानगरपालिकेकरिता लागू असल्याने कुरखेडा नगर पंचायतीकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या ६७ इतकी होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ कलम ३ अन्वये सदर ६७ लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी, https://mahaulb.in/PortalSite/#/app/home या वेब पोर्टल वर व कुरखेडा नगर पंचायतच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्वा/- पंकज भा. गावंडे
मुख्याधिकारी
नगरपंचायत कुरखेडा

Scanned with OKEN Scanner